# चारोळ्या – भाग २६

मी देवाला विचारले
देवा, मी तुला काय देऊ?
तेव्हा देव हसले, अन् म्हणाले,
आता राहू दे
वेळ येईल तेव्हा पाहू.

देवानं मला विचारलं
सांग तुला काय देऊ?
मी म्हणाली, आता काही नको,
फक्त मला एक सांग,
आजवर जे तू मला दिलंस
त्याचं आता काय करू?

देव म्हणाला समईला
रात्रंदिवस जळून तूं
का इतकी दमतेस?
स्वता जागतेस, अन्
मलाही जागवतेस.

देवापुढला दिवा
देवाला म्हणाला
देवा, झोप लागली यायला
सांगू का वाऱ्याला
मला विझवायला.

– पद्माकर चित्रे
(‘मी न माझा’ या चारोळीसंग्रहातून)